**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
**दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६/४७ फॅक्स क्रमांक : ०२०-२६१३३०८२,**
**Email — drcs-om.pune@gov.in commcoop२०११@gmail.com**

जा.क्र.सर्वसाधारण/१५स.आ/मा.अधि.कायदा/सह.संस्था/ २०१८ / ३०८ दिनांक-२५/०५/२०१८

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) सर्व

**विषय- मा. उच्च न्यायालय यांचे निर्णयानुसार सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू करणे बाबत...**

**संदर्भ- कक्ष अधिकारी (१३-स), क्रमांक संकिर्ण १०१७/प्र.क्र.१०६/१३-स, दि. २५/०४/२०१८**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने विधी व न्याय विभागाने खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत:-

**माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(ह) अन्वये सहकारी संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण नाही व माहिती अधिकार कायदयान्वये नागरीकांनी मागितलेली माहिती देणे तिच्यावर बंधनकारक नाही. तथापि सहकारी संस्थांचे निबंधक किंवा त्यांचे कनिष्ठ अधिकारी यांना महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० अन्वये एखादया संस्थेविषयीची जी माहिती उपलब्ध होते अगर उपलब्ध करून घेता येते ती पुरवणे सार्वजनिक प्राधिकरण या नात्याने बंधक कारक आहे.**

उक्त अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात यावी तसेच या बाबत आपल्या अधिनस्त जिल्हा व तालुका कार्यालयांना त्वरीत सदर पत्राची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करणे बाबत कळविण्यात यावे.

**मा. सहकार आयुक्त व निबंधक)**
**यांचे मान्यतेने)**

**अपर निबंधक (सर्वसाधारण)**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत माहितीस्तव-**

१. पर्यवेक्षकीय अधिकारी (सर्व), सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे
२. मा.सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, सचिव कक्ष, मुख्यालय, पुणे
३. कार्यासन अधिकारी (सर्व), सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे